# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७३–२०१०/ दिनांक :

श्री. हुसेनसाब मिरासाब मुल्ला,
मु. पो. खोजानवाडी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली

<u>**कोरम**</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. हुसेनसाब मिरासाब मुल्ला, मु.पो. खोजानवाडी, ता. जत, जि. सांगली या अर्जदाराने शेतीपंपासाठी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि ११.८.२००८ रोजी वि.प.कडे रु. २५००/– इतकी रक्कम भरुन आपली मागणी नोंदविली आहे. रक्कम जमा केली असूनही कृती मानकातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत जोडणी दिली नसल्याने सदर विलंबासाठी भरपाई निश्चित करावी व वीज जोडणी द्यावी अशी मागणी मंचामध्ये आपल्या दि. १८.३.२०१० च्या अर्जाने ग्राहकाने नोंदविली आहे. मंचामध्ये ' अ ' प्रपत्रामधील मागणी अर्ज नोंदविण्यापूर्वी अंतर्गत कक्षात ' क्ष ' नमुन्यात दि. १९.१२.२००९ रोजी अर्ज केल्याचे नमूद केले आहे. मंचाने अर्ज दाखल करुन घेवून पुढील कार्यवाही चालू करुन दि. ३.५.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख निश्चित करुन तसे उभयतांना कळविले.

तक्रारदार ग्राहकाने केलेला अर्ज, त्यासोबतची इतर कागदपत्रे, वि.प.चा मुद्देनिहाय अभिप्राय व नंतर दि. १७.५.२०१० रोजी दाखल केलेली कागदपत्रे या आधारे मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

ग्राहकास दि. ११.८.२००८ रोजी चलन दिले आहे ते वि.प.स मान्य आहे, मात्र त्यानंतर चाचणी अहवाल २३.४.२०१० रोजी दिल्याचे आपल्या अभिप्रायाच्या पत्रात वि.प.ने नमूद करुन कृती मानकातील तरतुदींनुसार काम पूर्ण करुन वीज जोडणी देण्यात येईल अशी स्पष्ट केले आहे.

दि. २३.४.२०१० रोजी ग्राहकाने चाचणी अहवाल दिला आहे हे वि.प.ने मान्य केले आहे, तथापि वाहिनीचा विस्तार व रोहित्र उभारणी करणे ही कामे वि.प.स करावयाची आहेत हे वि.प.ने हजर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. त्यासाठीच वि.प.स कागदपत्रे हजर करण्यासाठी सुनावणीनंतरही मुदत दिलेली आहे. सर्व कागदपत्रें पाहिल्यावर, वि.प.ने वास्तविक ग्राहकास चाचणी अहवाल सादर करण्यासाठी पूर्वीच लिहीणे आवश्यक होते तसे लिहिलेले नाही. मात्र ग्राहकाने प्रथमत: कक्षात व नंतर तक्रार दाखल केल्यानंतर चाचणी अहवाल दि.२३.४.२०१० रोजी दिला, हे कसे काय घडले ? याचा खुलासा उभयतांनी केलेला नाही. आपला अर्ज पूर्ण नसल्याने ग्राहकाने अर्जाच्या पूर्ततेसाठी चाचणी अहवाल दि. २३.४.२०१० रोजी दिला असे ग्राह्य मानून वाहिनीचा विस्तार व रोहित्र उभारणी यासाठीचा विनियमातील कालावधी गृहीत धरुन दि.२२.४.२०११ पर्यंत वि.प.ने ग्राहकास जोडणी द्यावी असे मंच स्पष्ट करीत आहे. तसेच दि. २३.४.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला असल्याने विलंब भरपाईचा प्रश्न निकाली काढण्यात येत आहे.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाली आहे किंवा कसे याची खबरदारी ग्राहकाने वेळच्यावेळी घेतली पाहिजे. तसेच सातत्याने वि.प.च्या संपर्कात राहिले पाहिजे किंवा लेखी पत्र वा अर्जाने आपली मागणी वि.प.कडे नोंदविणे आवश्यक आहे तशी कोणतीच कृती ग्राहकाने केल्याचे आपल्या निवेदनात नमूद केलेले नाही ही गोष्ट प्रकर्षाने मंचाच्या निदर्शनास आली आहे.

## आदेश

१) अर्जदाराचा मागणी अर्ज अंशत: मान्य करणेत येत आहे.

२) २३.४.२०१० रोजी चाचणी अहवाल दिल्यानंतर मागणी अर्जाची पूर्तता झाली असे गृहीत धरुन तसेच वाहिनीचा विस्तार व रोहित्र उभारणीचे काम असल्याने कृती मानकातील तरतुदीनुसार २२.४.२०११ पर्यंत सर्व कामाची उभारणी करुन ग्राहकास वीज जोडणी देणेत यावी.

३) अंमलबजावणी केल्याचा अहवाल वीज जोडणीनंतर मंचास पाठवावा.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :